महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
CIN-U४०१०९MH२००५SGC१५३६४५

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
वितरण विभाग, पाचवा माळा, प्रकाशगड, प्लॉट क्र. जी-९,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
फॅक्स क्र.: ०२२-२६४७२९३७, दुरध्वनी क्र.: ०२२ २६४७२१३१/ २६४७४२११,
ई-मेल: cedist@mahadiscom.in, वेबसाईट: www.mahadiscom.in

**क्र. मु.अ.(वितरण)/ डी-४/ म.वि.नि.आयोग/** No 25079 **दिनांक:** 12 OCT 2017

## परिपत्रक

**विषय:** सर्विस लाईन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत वीज ग्राहकांना परतावा करणेबाबत.

**संदर्भ:** १) मा. आयोगाचा आदेश दि. ०८ सप्टेंबर २००६
२) वाणिज्यीक परिपत्रक क्र. ४३ दि. २७ सप्टेंबर २००६.
३) वाणिज्यीक परिपत्रक क्र. २१५६० दि. ०९ मे २००७.
४) मा. आयोगाचा आदेश केस क्र. ८२/२००६ दि. १७ मे २००७.
५) मा. आयोगाचा आदेश केस क्र. ८२/२००६ दि. २१ ऑगस्ट २००७.
६) परिपत्रक क्र. मु.अ.(वितरण)/ डी-३/म.वि.नि.आयोग/३४३०७ दि. ०३ सप्टेंबर २००७.
७) पत्र क्र. म.वि.नि.आयोग/तां/आ.व. २०१७-१८/३९५५ दि. २० जुलै २०१७.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या केस क्र. ७०/२००५ मधील दि. ०८ सप्टेंबर २००६ तसेच केस क्र. ८२/२००६ मधील दि. १७ मे २००७ व २१ ऑगस्ट २००७ च्या आदेशांनुसार आकारांची अनुसूची व संदर्भ क्र. २, ३ व ६ अन्वये परिपत्रके जारी करण्यात आलेली होती.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपिल क्र. ४३०५/२००७ संदर्भातील आदेशानुसार वीज ग्राहकांकडून वसुल करण्यात आलेले सर्विस लाईन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत वीज ग्राहकांना व्याजासह परतावा करणेबाबत, मा. आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ दि. १७ मे २००७ व २१ ऑगस्ट २००७ च्या अनुषंगाने निर्देश देण्यात आले असून याबाबत खाली नमूद केल्याप्रमाणे सूचना जारी करण्यात येत आहेत.

१. मा. आयोगाच्या आदेशानुसार वीज ग्राहकांकडून दि. २० जानेवारी २००५ ते दि. ३० एप्रिल २००७ या कालावधीत वसुल करण्यात आलेले सर्विस लाईन कनेक्शन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत वीज ग्राहकांना लागू असलेल्या व्याजासह परतावा करण्यात यावे.
२. सदर परतावा देणे कामी वीज ग्राहकांकडील मुळ पावती महावितरण कार्यालयात जमा करण्यात यावी व सर्विस लाईन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत वीज ग्राहकांना लागू असलेल्या व्याजासह परतावा करावा.
३. वीज ग्राहकांकडे मुळ पावती नसल्यास आवश्यक स्टॅम्प ड्युटी रक्कमेचा Indemnity Bond महावितरण कार्यालयात जमा करण्यात यावा. तसेच रक्कमेचा परतावा करण्यापूर्वी सदर ग्राहकांची 'ग्राहक वैयक्तिक वीज देयकांची खातेवही (CPL)' तसेच या संदर्भातील रोख पुस्तिकेची (Cash Book) पडताळणी करण्यात यावी.
४. सदर रक्कमेचा परतावा करताना उपविभाग/ विभाग/ मंडल कार्यालयात संबंधित दस्तऐवज व नोंदवही अद्यावत नोंदीसह ठेवण्यात यावी.
५. सर्विस लाईन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत परतावा लागू असलेल्या व्याजासह संबंधित ग्राहकांच्या वीज देयकांद्वारे देण्यात यावा.
६. ज्या विज ग्राहकांचा वीज पुरवठा तात्पुरता वा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आला आहे त्यांना सदर रक्कमेचा परतावा करताना थकीत रक्कम समायोजित करून उर्वरीत रक्कम वीज देयकांद्वारे अदा करावी.

७. ज्या वीज ग्राहकांना समर्पित वितरण सुविधेद्वारे (Dedicated Distribution Facility-DDF) वीज पुरवठा देण्यात आलेला आहे त्यांना सर्विस लाईन आकार, आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व वीज मीटरची किंमत लागू असलेल्या व्याजासह परतावा करण्यात येऊ नये.

८. सदर रक्कमेचा परतावा केलेल्या वीज ग्राहकांची महावितरणच्या माहिती तंत्रज्ञान प्रणालीद्वारे नोंद ठेवण्यात यावी.

९. सदर परतावा रक्कमेची नोंद SAP-ERP प्रणालीमध्ये ठेवावी जेणेकरून त्याबाबतची नोंद महावितरणच्या आर्थिक खातेपुस्तिकेत दिसून येईल.

संदर्भ क्र. ३४३०७ दि. ०३ सप्टेंबर २००७ अन्वये जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार सदर रक्कमेचा परतावा यापूर्वी केलेला असल्यास उर्वरीत रक्कमच वीज देयकांद्वारे परतावा करण्यात यावा.

त्याप्रमाणे मा. आयोगाला वेळोवळी सदर रक्कमेच्या परताव्याबाबत माहिती देण्याकरीता खाली दिलेल्या विहित नमुन्यात सदर रक्कमेच्या परताव्यासंबंधित लेखा परिक्षित माहिती या कार्यालयास सादर करण्यात यावी.

| अ. क्र. | मंडळ | वीज ग्राहकांची संख्या | दि. २० जानेवारी २००५ ते दि. ३० एप्रिल २००७ कालावधीत वसूल करण्यात आलेली रक्कम | | | | वीज देयकाद्वारे परतावा केलेली रक्कम | | | | | परतावा केलेला दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्विस लाईन आकार | आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार | वीज मीटर किंमत/आकार | एकूण | सर्विस लाईन आकार | आऊट-राईट कॉन्ट्रीब्युशन आकार | वीज मीटर किंमत/आकार | व्याज | एकूण | |
| | | | | | | | | | | | | |

सदर परिपत्रक तात्काळ लागू करण्यात येत असून त्याचे काटेकोर पालन करावे.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

मुख्य अभियंता (वितरण)

**प्रत सविनय सादर :-**

१. मा. संचालक (वित्त), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२. मा. संचालक (संचलन/ प्रकल्प), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
३. मा. कार्यकारी संचालक -१(वाणिज्य)/ २(वितरण)/ ३(वितरण)/ ४(प्रकल्प), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
४. मा. सहव्यवस्थापकीय संचालक, म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद.
५. मा. प्रादेशिक संचालक, म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रादेशिक कार्यालय, कोकण/ पुणे/ नागपूर.

**प्रत सविनय रवाना :-**

१. मुख्य अभियंता (वाणिज्य/ एकात्मिक ऊर्जा गतिमान विकास/ भार व्यवस्थापन/ वीज खरेदी विभाग/ सामुग्री व्यवस्थापन), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त/ लेखा/ माहिती तंत्रज्ञान), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
३. कंपनी सचिव, म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
४. मुख्य विधी सल्लागार, म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
५. मुख्य अभियंता, म. रा. वि. वि. कं. मर्या., सर्व परिमंडल, कार्यालये.

**प्रत:-**

१. अधिक्षक अभियंता (वीज दर कक्ष), म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म. रा. वि. वि. कं. मर्या., प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.